# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 20/02/2023 (सोमवार) सायंकाळ

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. बुट्टीबोरी :- अंतर्गत ०३ कि.मी अंतरावर मौजा सातगाव किन्हाळगाव येथे दिनांक १९/०२/२०२३ चे २३.५९ वा. दरम्यान शिवजयंती असल्याने मोहल्ल्यात महाप्रसादाचा कार्यक्रम होता. महाप्रसाद घेणेकरीता फिर्यादी नामे- गोविंदा सुनिल गिरसावळ, वय २८ वर्ष, रा. सातगाव किन्हाळगाव ता. हिंगणा हे गेले असता प्रसाद घेतल्यानंतर घरी परत जात असुन कोणासोबत तरी झगडाभांडण होतांना त्यांना दिसले म्हणून भांडण सोडवण्याकरीता फिर्यादी हे मधात गेले असता आरोपी नामे- १) सूमीत टेंभरे, याला फिर्यादीचा धक्का लागल्याने तो खाली पडला. ते पाहून आरोपी नामे- २) सौरभ टेंभरे दोन्ही रा. सातगाव किन्हाळगाव याने धावत जावून लोखंडी वस्तू घेवून आला व फिर्यादीच्या डोक्यावर दोन ते तिन वेळा मारले तेव्हा आरोपी सूमीत टेंभरे याने सूध्दा धारदार चाकूसारख्या वस्तूने फिर्यादीला पोटावर मारल्याने जखम होवून रक्त निघू लागले. त्यानंतर दोघेही घटनास्थळाहुन निघून गेले. फिर्यादीला ओळखीचे उमेश मेश्राम यांनी माया हॉस्पीटल बुट्टीबोरी येथे पुढील वैद्यकीय उपचाराकरीता भरती केले असुन जखमीचा वैद्यकीय उपचार सूरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बुट्टीबोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. राकेश साखरकर मो. नं. ७३५०९०२१०० हे करीत आहे.

## हुंडाबळीस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. कळमेश्वर** :– फिर्यादी नामे– कु. नलिनी कृष्णाजी भडंग वय २१ वर्ष, रा. खंडाळा यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे अप. क्र. ५५५/२०२० कलम ३०४(ब), ३०६, ४९८ (अ), ३४ कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

आरोपी नामे–. १) शोभा पंजाबराव तिजारे, वय ५८ वर्ष, दोन्ही रा. घोराड २) अमित शंकरराव धांडे, वय ३० वर्ष याने त्याची पत्नी मृतक नामे– मेघा अमित धांडे, वय वय २३ वर्ष हिला ''वडीलांकडुन पैसे घेवुन ये'' असे वारंवार बोलुन दारू पिवुन नेहमी शिवीगाळ करून मारपीट करीत होता. म्हणुन त्याचे त्रासाला कंटाळुन मृतक हिने विष प्राशन करून मरण पावली

सदर प्रकरणाचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक मनोज खडसे पोस्टे कळमेश्वर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक २०/०२/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. कदम न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपी क्र. २ यास कलम ४९८ (अ), ३४ भादवि मध्ये ०१ वर्षाची साधी कैद व ५०००/–रू. दंड दंड न भरल्यास ०१ महीना साधी कैद तसेच आरोपी क्र. १ हिला कलम ४९८ (अ), ३४ भादंवि मध्ये ०२ महीने साधी कैद व २०००/–रू. दंड दंड न भरल्यास १५ दिवस साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती नायर मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सफौ कडबे, पोस्टे कळमेश्वर यांनी मदत केली आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. कुही** :– अंतर्गत २२ किमी अंतरावर मौजा पाचगाव शिवार उमरेड येथे दिनांक २०/०२/२०२३ चे सकाळी ०४.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– कमलजितसिंग मलकीतसिंग गिल, वय ४६ वर्ष, रा. मिसाळे ले आउट पाटनकर चौक नागपूर हे दिनांक १९/०२/२०२३ रोजी नेहमी प्रमाणे सकाळी १०.३० वा. दरम्यान आपले मोटार गॅरेज रिपेरींग दुकानात गेले असता दिवसभर आपले दुकानात हजर राहुन सायंकाळी ०५.०० वा. चे दरम्यान आपले दुकान बंद करून शटरला कुलुप लावुन आपले घरी आले असता नमुद घटनावेळी व ठिकाणी फिर्यादी हे घरी हजर असतांना फिर्यादीचे दुकानाचे बाजुला वेल्डींगचे दुकानवाला नामे– नाझीम पठान, रा. ताजबाग नागपूर यांनी फिर्यादीच्या मोबाईलवर फोन करून सांगितले की, तुमचे दुकानाचे शटर वाकलेले आहे व चोरी झालेली आहे असे सांगितले. फिर्यादीने लगेच आपल्या दुकानात जावुन पाहीले असता फिर्यादीचे मोटार गॅरेज रिपेरींग दुकानाचे लावलेले लोखंडी शटर खालुन मध्यभागातून वाकलेले दिसले. आपले दुकान उघडुन पाहीले तर दुकानाचे टेबलचे काउंटर ड्रॉपमध्ये ठेवलेले एकुण २०,०००/–रू. कोणीतरी ०२ अज्ञात चोराने दुकानाचे शटर वाकवुन दुकानाच्या आत प्रवेश करून चोरी करून घेवुन गेले. तसेच फिर्यादीच्या दुकानाचे बाजुला असलेले रोशन शमीम शहा, वय ३४ वर्ष, रा. भरतवाडा कळमना नागपूर यांच्या मालकीचे ताज मोटर्स या दुकानाचे शटर वाकवुन चोरी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच राकेश हटवार यांचे राकेश ट्रेडर्स या दुकानाचे शटर वाकवुन चोरी करण्याचा प्रयत्न केला. तसेच पाचगाव बस स्टॅड येथील शाकीर आरीफ शेख याचे किंग मोटर्स दुकानाचे शटर वाकवुन चोरी करण्याचा प्रयत्न केला.तसेच दुकानाच्या बाजूला असलेल्या डॉ. डोंगरवार यांचे दवाखान्याचे शटर वाकवुन चोरी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु कोणत्याही प्रकारचे सामान चोरी गेलेले नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपींविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवाजी बोरकर मो. नं. ८३२९१३०४५८ हे करीत आहे.

## दुखापत

**पो.स्टे. नरखेड :—** अंतर्गत २५ किमी अंतरावर मौजा खापरी शिवार येथे दिनांक १९/०२/२०२३ चे १२.३० वा. ते १८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— नारायन नामदेव राऊत, वय ५५ वर्ष, रा. आग्रा नरखेड हे आपले शेतात बाजेवर बसुन असता ११.०० वा. चे सुमारास आरोपी क्र. १) मंगेश सुंखदेव वाढीवे याने फिर्यादी जवळ जावुन दारूची मागणी केली असता फिर्यादीने दारू नाही विकत असे म्हटल्याने आरोपी निघुन गेला व पुन्हा आरोपी क्र. २) गोपाल उर्फ गुड्डु जगनराव कुंभरे, रा. दोन्ही खापरखेडा ला सोबत घेवुन जावुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीस मगाशी दारू का दिली नाही असे म्हणुन काठीने कानावर पाठीवर मारून जख्मी केले व साक्षीदार महेन्द्र केशव काकडे याचे शेतात जावुन त्याला सुध्दा काठीने डोक्यावर पाठीवर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ३४ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अरूण भेन्डे ब. नं ६४२ मो. क्र. ९९२३१९३६४२ हे करीत आहे.

**पो.स्टे. पारशिवनी :—** अंतर्गत ०७ किमी अंतरावर मौजा भागेमारी येथे दिनांक १८/०२/२०२३ ते २२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ. रंजिता प्रकाश कासार, वय २६ वर्ष, रा. भागेमाहेरी यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी याचे पतिला यातील  अनोळखी आरोपीने याने तुझे बापाचा रोड आहे का असे म्हणून शिवीगाळ करून थापड मारली त्यांच्या झगडयाचा आवाज ऐकून त्याचा मित्र सुध्दा आला व तिथेच ठेवलेल्या काडया मधून एक एक काठी उचलून एकाने पायावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन पारशिवनी करीत करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**